# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(विद्या विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली — ४४२६०५ फोन नंबर ०७१३२—२२२२०४,२२३३२३


क्र/गोविग./विद्या/शि.शु./२२५/२०१९ दिनांक : १०/०५/२०१९

प्रति,

**मा.प्राचार्य/विभाग प्रमुख,**
**सर्व संलग्नित/संचालित महाविद्यालय व शैक्षणिक विभाग,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषय:— शुल्क निश्चिती समितीकडे शुल्का बाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०१(३) नुसार विद्यापीठाने डॉ.एस.टी.देशमुख (माजी.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती) यांचे अध्यक्षतेखाली शुल्क निश्चिती समिती गठीत केलेली आहे. सदर समितीची सभा संलग्नित महाविद्यालयातील प्राप्त प्रस्तावानुसार आयोजीत करावयाची आहे. सत्र २०१९—२० करिता ज्या महाविद्यालयांना विद्या परिषदेने विहीत केले असेल आणि मान्यता दिली असेल अशा शुल्का व्यतिरिक्त वेगळे शुल्क आकारण्याची इच्छा असेल, अशा कोणत्याही विविध अभ्यासक्रमाकरीता विना अंनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयास शुल्क निश्चिती समितीकडे प्रस्ताव सादर करावयाचा असेल, तर त्यांनी दिनांक ३०/०५/२०१९ रोजी पर्यत उपकुलसचिव (विद्या) यांचेकडे सादर करावा हि विंनती.

<u>सादर करावयाचे दस्ताऐवज:—</u>

१) संबधीत अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनाने परवानगी दिल्याचे पत्र, विद्यापीठाने संलग्निकरण दिल्याबाबतचे पत्र, संबधीत अभ्यासक्रमासाठी निर्धारीत प्रवेश क्षमता.

२) संबधीत अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पुर्णकाळ मान्यताप्राप्त व CHB शिक्षकांची यादी व विद्यापीठाद्वारे मान्यता देण्यात आलेल्या पत्राची प्रत व त्यांना देण्यात येत असलेल्या वेतनासंबधीचा मासीक व वार्षिक तपशील.

३) संबधीत अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अंशदानात्मक मान्यताप्राप्त शिक्षकांची यादी तसेच त्यांना देण्यात येत असलेल्या मानधनासंबधीचा मासीक व वार्षिक तपशिल.

४) संबधीत महाविद्यालयात इतरही अभ्यासक्रम (अनुदानित/विना अनुदानित) सुरु असल्यास त्याबाबतची तपशिल आणि विभागात नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची पदनिहाय यादी व त्यांना देण्यात येत असलेल्या वेतनासंबधी मासीक व वार्षिक तपशिल.

५) संबधीत महाविद्यालयात ज्या अभ्यासक्रमाच्या शुल्क निर्धारणासाठी प्रस्ताव पाठविलेले आहेत तेच अभ्यासक्रम सुरु असल्यास यासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची पदनिहाय यादी व त्यांच्या मासिक व वार्षिक वेतनाबाबतचा तपशिल.

६) आवर्ती व अनावर्ती खर्चासंबधी मागील तीन वर्षाचे खर्च व उत्पन्नाचे अंकेक्षित प्रमाणपत्र (Audited income and expenditure Statement) उपस्थिती विवरण (Balancesheet).

७) सदर अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त पुर्णकाळ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नावाचा समावेश असलेल्या प्रमाणित बिंदुनामावलीची झेरॉक्स प्रत.

८) शुल्क निर्धारण प्रस्तावात मागणी केलेल्या शिक्षण व इतर शुल्काबाबतचा सविस्तर स्पष्टीकरणासह (Justification) तपशिल.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव